नगरसेवा टाइम्स संमीश्र

उरसळ फार्मसी महाविद्यालयामध्ये, राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिन साजरा

खराडी |

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या खराडी येथील शंकरराव उरसळ कलिज ऑफ फार्मास्युटिकल सायन्स आणि रिसर्च सेंटर या महाविद्यालयांमध्ये नुकतेच "राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिन" कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदरच्या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून सासवड येथील वाघिरे महाविद्यालयाचे माजी प्राध्यापक, सुप्रसिद्ध व्याख्याते डॉ. श्री. नारायण टाक हे उपस्थित होते. सदरच्या कार्यक्रम प्रसंगी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे माजी सदस्य व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक भोसले, उपप्राचार्य डॉ. विजया बरगे, पदविका विभागाचे विभाग प्रमुख डॉ. सुजित काकडे तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थिनी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुण्यांचे स्वागत तसेच राष्ट्रीय सेवा योजना आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ गीत यांनी करण्यात आली. सदरच्या कार्यक्रमानिमित्त महाविद्यालयातील अंतिम वर्ष बी. फार्मसीच्या कु. प्रियांका साबळे व कु. मंथन गायकवाड या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना युनिट तर्फे मागील शैक्षणिक वर्षांमध्ये महाविद्यालयातर्फे राबविलेले विविध उपक्रम यांची थोडक्यात माहिती देऊन आपले मनोगत व्यक्त केले व तदनंतर राष्ट्रीय सेवा योजनेच्या विविध उपक्रमावरील व्हिडिओ स्वरूपातील सादरीकरण केले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी आणि सासवड येथील वाघिरे महाविद्यालयाचे माजी प्राध्यापक, सुप्रसिद्ध व्याख्याते डॉ. श्री. नारायण टाक यांनी मनोगत व्यक्त करताना प्रथम महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना युनिट द्वारे राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमाबद्दल महाविद्यालयाचे व राष्ट्रीय सेवा योजना युनिटचे हार्दिक अभिनंदन आणि कौतुक केले. प्राध्यापक डॉ. श्री. नारायण टाक यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे सिद्धांत वाक्य "मला नाही, तुम्हाला" असल्याचे सांगून निःस्वार्थ सेवाभाव त्यामागे असल्याचे त्यांनी सांगितले . विद्यार्थ्यांना संबोधित करताना राष्ट्रीय एकात्मता ,व्यक्तिमत्व विकास, कर्मशील ज्ञान हे या योजनेचे ध्येय असून शिक्षित जनशक्तीच्या गुणवत्तेमध्ये सुधारणा करून उत्तम राष्ट्रभक्त नागरिक घडवण्याची प्रक्रिया म्हणजे राष्ट्रीय सेवा योजना होय असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या प्रस्ताविकामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक भोसले यांनी प्रथमःता "राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिन" निमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा दिल्या. राष्ट्रीय सेवा योजनेचा उद्देश करुणा, मानवता आणि सहकाऱ्यांबद्दलच्या भावना या मूल्यांना प्रोत्साहन देणे आहे. राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक आणि नागरी जबाबदारीची भावना विकसित करण्याचा प्रयत्न करते आणि त्यांना वैयक्तिक, सामुदायिक समस्यांवर व्यावहारिक उपाय शोधण्यासाठी त्यांच्या ज्ञानाचा वापर करण्यास प्रशिक्षित करते असे त्यांनी विद्यार्थ्यांना संबोधित केले. सदरच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे मा. सदस्य आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक भोसले यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.सौ. भाग्यश्री शेलार, प्रा.श्री नितीन नेहरकर पदविका विभागाच्या राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.कु. बिल्वदा बैचे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाविद्यालयातील विद्यार्थिनी कु. श्रावणी वाबळे तर आभार प्रदर्शन कु. प्रियांका साबळे यांनी केले. खराडी येथील शंकरराव उरसळ फार्मसी महाविद्यालयामध्ये "राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिन" कार्यक्रम संपन्न पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या खराडी येथील शंकरराव उरसळ कलिज ऑफ फार्मास्युटिकल सायन्स आणि रिसर्च सेंटर या महाविद्यालयांमध्ये नुकतेच "राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिन" कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदरच्या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून सासवड येथील वाघिरे महाविद्यालयाचे माजी प्राध्यापक, सुप्रसिद्ध व्याख्याते डॉ. श्री. नारायण टाक हे उपस्थित होते. सदरच्या कार्यक्रम प्रसंगी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे माजी सदस्य व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक भोसले, उपप्राचार्य डॉ. विजया बरगे, पदविका विभागाचे विभाग प्रमुख डॉ. सुजित काकडे तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थिनी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुण्यांचे स्वागत तसेच राष्ट्रीय सेवा योजना आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ गीत यांनी करण्यात आली. सदरच्या कार्यक्रमानिमित्त महाविद्यालयातील अंतिम वर्ष बी. फार्मसीच्या कु. प्रियांका साबळे व कु. मंथन गायकवाड या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना युनिट तर्फे मागील शैक्षणिक वर्षांमध्ये महाविद्यालयातर्फे राबविलेले विविध उपक्रम यांची थोडक्यात माहिती देऊन आपले मनोगत व्यक्त केले व तदनंतर राष्ट्रीय सेवा योजनेच्या विविध उपक्रमावरील व्हिडिओ स्वरूपातील सादरीकरण केले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी आणि सासवड येथील वाघिरे महाविद्यालयाचे माजी प्राध्यापक, सुप्रसिद्ध व्याख्याते डॉ. श्री. नारायण टाक यांनी मनोगत व्यक्त करताना प्रथम महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना युनिट द्वारे राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमाबद्दल महाविद्यालयाचे व राष्ट्रीय सेवा योजना युनिटचे हार्दिक अभिनंदन आणि कौतुक केले. प्राध्यापक डॉ. श्री. नारायण टाक यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे सिद्धांत वाक्य "मला नाही, तुम्हाला" असल्याचे सांगून निःस्वार्थ सेवाभाव त्यामागे असल्याचे त्यांनी सांगितले . विद्यार्थ्यांना संबोधित करताना राष्ट्रीय एकात्मता ,व्यक्तिमत्व विकास, कर्मशील ज्ञान हे या योजनेचे ध्येय असून शिक्षित जनशक्तीच्या गुणवत्तेमध्ये सुधारणा करून उत्तम राष्ट्रभक्त नागरिक घडवण्याची प्रक्रिया म्हणजे राष्ट्रीय सेवा योजना होय असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या प्रस्ताविकामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक भोसले यांनी प्रथमःता "राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिन" निमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा दिल्या. राष्ट्रीय सेवा योजनेचा उद्देश करुणा, मानवता आणि सहकाऱ्यांबद्दलच्या भावना या मूल्यांना प्रोत्साहन देणे आहे. राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक आणि नागरी जबाबदारीची भावना विकसित करण्याचा प्रयत्न करते आणि त्यांना वैयक्तिक, सामुदायिक समस्यांवर व्यावहारिक उपाय शोधण्यासाठी त्यांच्या ज्ञानाचा वापर करण्यास प्रशिक्षित करते असे त्यांनी विद्यार्थ्यांना संबोधित केले. सदरच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे मा. सदस्य आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक भोसले यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.सौ. भाग्यश्री शेलार, प्रा.श्री नितीन नेहरकर ,पदविका विभागाच्या राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.कु. बिल्वदा बैचे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाविद्यालयातील विद्यार्थिनी कु. श्रावणी वाबळे तर आभार प्रदर्शन कु. प्रियांका साबळे यांनी केले.